## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

# राष्ट्रीय सेवा योजना

## दि. बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी , अकोला द्वारा संचालित

## श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला

# अहवाल : विशेष शिबीर

ग्राम : आपोती (खुर्द)

( दि. ०७/ १२ / २०१९ ते १४/ १२ / २०१९)

सत्र २०१९ – २०

# संत गाडगे बाबा अमरावती अमरावती विद्यापीठ अंतर्गत
# राष्ट्रीय सेवा योजना
# श्री रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय अकोला
## विशेष शिबीर – ग्राम आपोती (खुर्द)
# अहवाल
## दि. ०७/ १२ / २०१९ ते १४/ १२ / २०१९

**शनिवार**
**दिनांक : ०७/१२/२०१९**

**आगमन, पूर्वतयारी, स्वच्छता व नोंदणी**

ग्राम आपोती (खु.) येथे दिनांक ०७/१२/२०१९ रोजी विद्यार्थ्यांचे आगमन झाले, यानंतर विद्यार्थ्यांची नोंदणी व पूर्वतयारी करण्यात आली. सर्वप्रथम कार्यक्रम परिसर कर्मयोगी बाबासाहेब आपोतीकर विद्यालय येथे स्वच्छता करण्यात आली. तसेच गावकऱ्यांसोबत चर्चा व प्रकल्पांची पाहणी करण्यात आली. कार्यक्रम अधिकारी डॉ.रश्मी जोशी ह्यांनी ग्राम पंचायत मध्ये सरपंच उपसरपंच, महिला प्रतिनिधी व पोळीचे पाटील ह्यांना बोलावून सभा घेण्यात आली. तसेच बचत गटाच्या महिलांच्या सुद्धा २ सभा घेण्यात आल्या, ज्यामध्ये त्यांना शिबिरातील कार्यक्रमा बद्दल माहिती पुरविण्यात आली व सहभागी होण्याचे आव्हान करण्यात आले. "उन्नत भारत अभियान, स्वच्छ भारत स्वस्थ भारत"अभियान अंतर्गत ग्राम आपोती (खु.) येथे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची व कार्यक्रमाची माहिती कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी व डॉ. समाधान मुंडे यांनी गावकऱ्यांना दिली.

**रविवार**
**दिनांक : ०८/१२/२०१९**

**उद्घाटन समारोह**

ग्राम आपोती (खु.) येथे श्री. रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे उद्घाटन ०७ डिसेंबर २०१९ रोजी पार पडले. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष म्हणून मा. Adv. मोतीसिन्हजी मोहता, मानद सचिव दि.बी.जी.ई. सोसायटी, अकोला तथा सदस्य महाराष्ट्र-गोवा बार असोसिएशन, हे उपस्थित होते व उद्घाटक म्हणून क. शि. प्र. संस्था आपातापा चे अध्यक्ष श्री दामोदर कडू उपस्थित होते. मा.डॉ.व्ही.डी. नानोटी (प्राचार्य श्री.रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय,अकोला हे प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमाचे उद्घाटनास लाभले होते. कार्यक्रमाची शोभा वाढविण्यास इतर मान्यवर सुद्धा उपस्थित होते. सौ.लक्ष्मीताई संजय घुसे (सरपंच),डॉ.उमेशराव वि. बोपटे (उपसरपंच), श्री.कैलासराव वि. अपोतीकर (पोलीस पाटील), डॉ.शांतारामजी बुटे (संस्थापक क.शि.प्र.संस्था आपातापा) हे सुद्धा उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला हारार्पण व पूजन करून झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.डी.नानोटी यांनी केले. मा.ॲड.श्री.मोतीसिंहजी मोहता यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.मा.डॉ.आर.बी.हेडा यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात रासेयोच्या शिबिराची स्तुती करत मोठ्या प्रमाणात मुलींची संख्या असल्यामुळे अभिनंदन केले.त्यांनी मागील ६-७ वर्षांत त्यांना आलेला रासेयो शिबिराचा अनुभव सांगितला. रासेयो शिबिराद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो व विद्यार्थी खऱ्या अर्थाने घडतो असे सांगितले. विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी कार्य करून आपल्या व्यक्तिमत्त्वात भर टाकावा असे सांगितले. शिबिरार्थी स्वयंसेवकांना शिबिर आनंदी व यशस्वी होवो अशा शुभेच्छा दिल्या. गावच्या सरपंच सौ.लक्ष्मीताई घुसे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे गावातर्फे स्वागत केले. तसेच उपस्थित पोलीस पाटील श्री. कैलासराव आपोतीकर यांनी सुद्धा विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या कार्यक्रमाचे संचालन कार्यक्रम अधिकारी डॉ.रश्मी जोशी सावलकर तर आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी डॉ. समाधान मुंडे यांनी केले.या कार्यक्रमाला यशस्वी बनविण्याकरिता सह-कार्यक्रम अधिकारी प्रा. शैलेश जयस्वाल व प्रा.सोनाली गवांदे, विद्यार्थी गटप्रमुख अखिलेश पुराणिक , ऋषिकेश तिवारी , प्रसाद गुल्हाने,गौरव भटकर, उज्वल पटेल, संकेत ढेंगे, हृतुजा गोपनारायण, अमिषा मिश्र, देवयानी मुलात्कार, कल्याणी कनोजिया, दिव्या, राधिका पाटील, ममता परिहार व सर्व स्वयंसेवकांनी सहकार्य केले.

**रविवार**
**दिनांक : ०८/१२/२०१९**
**कार्यक्रम : संस्कारमय आध्यात्मिक ज्ञान**
**सादरकर्ते : आचार्य ह.भ.प. श्री ज्ञानेश्वरजी महाराज तायडे**

श्री.रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाद्वारे दत्तक ग्राम आपोती (खु.) येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या दुसऱ्या दिवसाच्या संध्याकाळच्या सत्रात ७ .०० वा आचार्य ह.भ.प. श्री ज्ञानेश्वरजी महाराज तायडे यांचे "संस्कारमय आध्यात्मिक ज्ञान" या विषयावर उद्बोधन शिबिरार्थींना लाभले होते. या कार्यक्रमात गावातील मंडळी आणि रासेयो शिबिरार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन गटप्रमुख अखिलेश पुराणिक यानी केले तर आभार प्रदर्शन हृतुजा गोपनारायण हिने केले.

**सोमवार**

**दिनांक : ०९/१२/२०१९**

**कार्यक्रम : “Team Building”**

**सादरकर्ते : मा. डॉ. महेश डाबरे** (श्रीमती ल.रा.तो. वाणिज्य महाविद्यालय, अकोला)

श्री. रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालयाद्वारे दत्तक ग्राम आपोती (खु.) येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या तिसऱ्या दिवसाच्या दुपारच्या सत्रात "टीम बिल्डिंग" या विषयावर मार्गदर्शनासाठी श्रीमती ल.रा.तो. वाणिज्य महाविद्यालयाचे प्रा.डॉ. महेश डाबरे हे आले होते. आजच्या स्पर्धेच्या युगात आणि स्पर्धेच्या जगात कशाप्रकारे मानसिक दडपण येते. तसेच आजच्या स्थितीत विशेष करून तरुण पिढीने कशा प्रकारे टीम वर्क च्या सहाय्याने व बुद्धिमत्तेने, एकतेने कोणत्याही कठीण परीशितीला सामोरे जाऊन जिंकता येते ,याची उदाहरणे देऊन टीम बिल्डिंग चे महत्त्व पटवून दिले. मनाने आनंदी विचाराने समृद्ध आयुष्य कशा प्रकारे जगता येईल या विषयीसुद्धा डॉ. महेश डाबरे यांनी उद्बोधन केले. कार्यक्रमाचे संचलन अखिलेश पुराणिक व आभार प्रदर्शन हृशिकेश तिवारी या विद्यारथ्यांनी केले.

**कार्यक्रम : “पर्यावरण संवर्धन आणि व्यसन मुक्ती ”**

**सादरकर्ते : मा. डॉ. अजय उपाध्याय (**गायत्री परिवार, अकोला )

दुपारी ३:०० वाजता घेण्यात आलेल्या व्यसनमुक्ती आंदोलन या कार्यक्रमासाठी डॉ. अजय उपाध्याय हे मार्गदर्शक म्हणून लाभले होते.तरुण वयातच या व्यसनांना आपण कसे बळी पडतो व त्यानंतर व्यसनाधीन होतो, हे अगदी सविस्तर समजावून सांगितले व अंमली पदार्थांचे कशा प्रकारे व्यसन लागते ते शास्त्रीय पद्धतीने समजावून सांगितले. व्यसनामुळे होणारी शरीराची हानी कशी न भरून काढण्यासारखी असते हे सांगत व्यसनांपासून दूर राहण्याचे शिबिरार्थींना आवाहन केले.तसेच व्यसन लागले असेल तर त्यापासून कशी सुटका करता येते याविषयी मार्गदर्शन केले व काही क्रांती गीते सादर करून विद्यार्थ्यांची मने जिंकली.

आजच्या या वाढत्या लोकसंख्येचा पर्यावरणावर होणारा आघात व यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या या बाबींवर त्यांनी विद्यार्थ्यांसोबत चर्चा केली. तसेच वाढत्या रासायनिक खतांचा सजीव सृष्टी वर होणारा परिणाम,जंगलतोड,वाढते तंत्रज्ञान यांच्या दुष्परिणामांची जाणीव त्यांनी शिबिरार्थींना करून दिली. तंत्रज्ञानाचे जेवढे फायदे आहेत त्यापेक्षा जास्त कदाचित नुकसान आहे याचा उल्लेख त्यांनी केला.या सर्व गोष्टींवर कशा प्रकारे आळा घालता येईल याबाबत त्यांनी शिबिरार्थींना अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे संचलन डॉ. समाधान मुंडे ह्यांनी केले तर आभार प्रदर्शन गोविंद आंधळे या विद्यार्थ्यांनी केले.

**कार्यक्रम : “Legal Awareness About Women”**

**सादरकर्ते : मा. Adv. निलिमा मानोरकर. (**कौटुंबिक न्यायालय, अकोला)

शिबिराच्या तिसऱ्या दिवशी मा. Adv. निलीमाताई मानोरकर ह्यांनी गावातील महिलांना तसेच विद्यर्थ्यांना महिलांच्या काय द्यांबद्दल माहिती दिलीn व जनजागृती केली. कौटुंबिक हिंसाचार, कार्यालयाच्या ठिकाणी होणारे विविध चेद्चाद विरोधी कायदे, POCSO कायद्याबद्दलची सविस्तर माहिती दिली. स्वारखा करण्याबाबत आव्हान केले. निलीमाताई ह्यांनी महिलांनी कायद्या बाबत जागरूक व सक्षम असे समाज घडविण्या करिता महिला घर बाहेर कामा करिता निघावे लागते व त्या कारीत महिलांच्या कायद्या विषयी त्यांचामध्ये कायद्याबद्दलची माहिती असणे अनिवार्य आहे हे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ रश्मी जोशी (रासेयो कार्यक्रम अधिकारी) यांनी करून दिला**.** संचालन आखलेश पुराणिक यांनी तर आभार प्रदर्शन उज्ज्वल पटेल ह्यांनी केले.

**मंगळवार**

**दिनांक : १०/१२/२०१९**

**कार्यक्रम : “रा.से.यो. द्वारा ग्रामविकास व उन्नत भारत ”**

**सादरकर्ते : मा. डॉ. राजेशजी बुरंगे** (प्र. संचालक, रा.से.यो., सं.गा.बा.अमरावती विद्यापीठ, अमरावती)

श्री. रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालयाद्वारे दत्तक ग्राम आपोती (खु.) येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या चौथ्या दिवसाच्या दुपारच्या सत्रात “रा.से.यो. द्वारा ग्रामविकास व उन्नत भारत” ह्या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. ह्या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजने चे समन्वयक, सं.गा.बा. अ. विद्यापीठ अमरावती हे उद्घाटक म्हणून लाभले. कार्यक्रमाचे अध्यक्ष होते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नानोटी हे होते. मा. डॉ. राजीवजी बोरकर, रासेयो सल्लागार समिती सदस्य व विद्यार्थी कल्याण समिती सदस्य आणि मा. डॉ. मिलिंद काळे, क्षेत्रीय समन्वयक रासेयो, अमरावती हे प्रमुख पाहुणे होते. गावचे उपसरपंच डॉ. उमेश बोपटे तसेच पोलीस पाटील श्री. आपोतीकर ह्यांची उपस्थिती लाभली. मा.डॉ. बुरुंगे ह्यांनी अतिशय सुंदर असे शिबिरार्थ्यांचे मार्गदर्शन केले. त्यांनी म्हटले कि रासेयो शिबीर हे संस्कार घडविते, श्रमदान करण्याचे संस्कार, गावातील जनजीवन कसे असते हि जाणीवकरून देते. गावांचा विकास करणे आणि उन्नत भारताची सुरवात हि रासेयोच्या माध्यमानी करणे गरजेचे आहे. रासेयो तून संस्कार घडविणे आणि गावांचा विकास म्हणजेच “ कॉलेज टू विलेज” हि भारत सरकारची देशाला उन्नत बंविण्यास्ठीची नवीन योजना रासेयो मार्फत राबविण्यात येईल असे त्यांनी सांगितले. डॉ. बोरकर ह्यांनी शिबिरार्थ्यांचे उत्कृस्था रीतीने उद्बोधन केले. रासेयो च्या कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी व डॉ. समाधान मुंडे ह्यांचे सुद्धा उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले.

**कार्यक्रम : “Angels at Work”**

**सादरकर्ते : मा. Adv. राधेश्यामजी मोदी** (आजीवन सदस्य, दि. बेरार एज्यु. सोसायटी, अकोला.)

श्री. रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालयाद्वारे दत्तक ग्राम आपोती (खु.) येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या चौथ्या दिवसाच्या दुपारच्या सत्रात “Angels at Work” ह्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सादरकर्ते होते मा. Adv. राधेश्यामजी मोदी (आजीवन सदस्य, दि. बेरार एज्यु. सोसायटी). त्यांनी पर्यावरणा खुसंवार्धना विषयी खूप सुंदर असे मार्गदर्शन केले. आपल्याला लाभलेले हे जे सुंदर असे पर्यावरण आहे तिथे अश्या खूप काही पोसिटीव आणि चागल्या गोष्टी असतात त्यांच्या पासून जगण शिकायला पाहिजे. पर्यावरणाचा ह्रास आपल्या कडून नाही झाला पाहिजे असे त्यांनी प्रतिपादन केले. ध्वनी प्रदूषण करून पण आपल्याकडून पर्यावरणाचा ह्रास होतो. टाळया वाजविल्याने पण हे होतो. शिबिरार्थ्यांना त्यांनी आत्मविश्वास कसा वाढवायचा, भाषेवर प्रभुत्व कसे आणायचे ह्या बद्दल सुद्धा मार्गदर्शन केले.

**कार्यक्रम :** **“कायदेविषयक मार्गदर्शन”**

**सादरकर्ते :** **मा. Adv. मोतीसिन्ह्जी मोहता** (मानद सचिव, दि. बेरार एज्यु. सोसायटी तसेच सदस्य महाराष्ट्र गोवा बार असोसिएशन व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अकोला. )

**सौजन्य :** **जिल्हा विधी सेवाप्राधिकरण,अकोला.**

दि बी. जी. ई. सोसायटी द्वारा संचालित, श्री. रालतो विज्ञान महाविद्यालया अंतर्गत रासेयो शिबिरामध्ये आपोती खुर्द या गावात दि. 10/12/19 रोजी कायदे विषयक मार्गदर्शन हा कार्यक्रम संपन्न झाला. सायंकाळच्या सत्रात "कायदेविषयक मार्गदर्शन" ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे मानद सचिव मा. ॲड. मोतीसिंहजी मोहता तर मार्गदर्शक म्हणून न्यायाधीश मा.अमित कोकरे, प्राचार्य मा. डॉ. विजय नानोटी, उपसरपंच मा. उमेश बोपटे, पोलीस पाटील मा. कैलासराव अपोतीकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी लाभलेले मा. ॲड. मोतीसिंहजी मोहता साहेब व प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले विध्यमान श्री स्वरुपजी बोस, विध्यमान श्री लाडवले साहेब आणि ॲड गजाननजी खाडे यांनी कायदे विषयक मार्गदर्शन उपस्थितांना केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शैलेश जयस्वाल यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. समाधान मुंडे यांनी केले. त्याच बरोबर श्री. रालतो विज्ञान महाविद्यालया चे प्राचार्य डॉ व्ही. डी. नानोटी सर, महिला कार्यक्रम अधिकार डॉ. रश्मी जोशी मॅडम, श्री दामोदरजी कडू गुरुजी, डॉ. उमेश बोपटे, श्री प्रमोद बोपटे, श्री ज्ञानेश्वर महाराज आधी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो सह.कार्यक्रम अधिकारी प्रा.शैलेश जयस्वाल तर आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी डॉ.समाधान मुंडे यांनी केले.

**बुधवार**

**दिनांक : ११/१२/२०१९**

पाचव्या दिवसाच्या सकाळच्या सत्रात प्रार्थना **,** स्फुर्तीगीते त्याचबरोबर शिबिरार्थ्यांनी व्यायाम व आसने करून स्वच्छता रॅली काढण्यात आली. त्यामध्ये गावकर्यांना “उन्नत भारत अभियान पारिवारिक सर्वेक्षण व महिला मेळाव्या” च्या आयोजन करण्यात आले आहे हे गावातील लोकांना सांगण्यात आले व त्यांना कार्यक्रमाला येण्याचे सांगितल्या गेले. त्याचबरोबर श्रमदानाकरिता गावातील सांडपाण्याचे व्यवस्थापन करण्याकरिता शोष खड्ड्यांचे ६० टक्के पर्यंत काम करण्यात आले.

**कार्यक्रम :** **“महिला मेळावा”**

**सौजन्य :** Women Cell (**श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय अकोला**)

**संयोजक :** **डॉ रश्मी जोशी सावलकर**

दुपारच्या सत्रात गावातील महिलांसाठी "महिला मेळाव्याचे" आयोजन करण्यात आले होते**.** कार्यशाळेचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ रश्मी जोशी (सावलकर) यांनी गावातील महिलांना करून दिला**.** या कार्यशाळेमध्ये “आजी चा बटवा” हि स्पर्धा घेण्यात आली आणि गावातील महिलाना दैनंदिन जीवनामध्ये स्वतःच्या प्रकृतीची काळजी कशी घेतली पाहिजे या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले तसेच लघु उद्योग कार्यक्रमांतर्गत पेपर बॅग्स बनवणे यावर कार्यशाळा घेण्यात आली**.** या महिला मेळाव्याचे अध्यक्ष प्रा**.** सुजाता ताडम मॅडम तर उदघाटक म्हणून गावातील सरपंच सौ लक्ष्मीताई घुसे उपस्थित होत्या**.** त्याचप्रमाणे गावातील महिला तसेच श्री रा**.**ल**.**तो**.** विज्ञान महाविद्यालयाच्या प्राध्यापिका मध्ये डॉ अर्चना सावरकर **,** डॉ पूनम अग्रवाल **,** श्रीमती वैशाली बडगुजर **,** डॉ कविता हेडा, डॉ अंजली सांगोले आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व मुली उपस्थित होत्या**.** कार्यशाळेच्या विविध सत्राचे संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी प्राडॉ. रश्मी जोशी सावलकर यांनी तर आभार प्रदर्शन रासेयोची गट प्रमुख हृतुजा गोपनारायण हिने केले.

**कार्यक्रम :** **“एक दिवसीय सोयाबीन प्रशिक्षण कार्यशाळा”**

**सादरकर्ते :** **मा.सौ. वनिता कदम** (दैनिक सकाळ, तनिष्का समन्वयक, अकोला.)

**संयोजिका :** **डॉ रश्मी जोशी सावलकर**

११/१२/१९ बुधवार रोजी **महिला-मेळावा** आयोजित करण्यात आला व **“सोयाबीन प्रशिक्षण कार्यशाळा”** घेण्यात आली व अध्यक्ष म्हणून लाभल्या मान. सौ. वनिता कदम, दै.सकाळ, तनिष्क समन्वयिका. सोयाबीन पासून दूध, गुलाबजाम, चकली, पनीर ई. पदार्थ गावातील महिलांना शिकविण्यात आले जेणेकरून कि त्या महिलांना घरगुती उद्योग सुरु करता यावे. ग्रामीण भागात सोयाबीन सहजच उपलब्ध होते आणि जास्त भांडवल ना लावता कामिखार्चात गृहउद्योग सुरु करता यावे म्हणून गावातील महिला वर्ग व मुलींना ह्याचे प्रशिक्षण दिल्या गेले. मेळाव्यात एक आगळी-वेगळी स्पर्धा, “आजीचा बटवा” घेण्यात आली. ह्या स्पर्धेत औषधी गुण असलेल्या पदार्थानचे गुणधर्म सांगायचे होते, ह्या स्पर्धेला महिलांचे उत्स्फूर्त प्रातिसाद लाभले. ७५ महिलांनी आपला सहभाग नोंदविला आणि त्या पैकी तीन पारीतोषीके देण्यात आली.

**कार्यक्रम :** **“सावित्रीच्या लेकी”**

**सादरकर्ते :** **मा.डॉ. स्वप्ना लांडे** (समाज सेविका)

दि.११/१२/१९ बुधवार रोजी मा. सौ.डॉ. स्वप्ना लांडे ज्या एक खूप उत्कृष्ट समाजसेविका आहेत व अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या सदस्या आहेत. "सावित्रीच्या लेकी" ह्या विषयावर त्यांनी खूप सुंदर असे व्याख्यान दिले. सावित्रीबाई फुले व आजची स्त्री मधील साम्य तसेचफरक काय आहे व आजच्या स्त्रीला सावित्रीबी सारखे गुण अंगीकारून काम करण्याची गरज आहे. खंबीर आणि सक्षम असलेली आजची स्त्री, घर आणि कार्यालय, अशी दुहेरि भूमिका बजावत आहे व त्यासाठी तिने ज्या सामंजस्याने ........

**गुरवार**

**दिनांक : १२/१२/२०१९**

**कार्यक्रम : "मासिकपाळी एक वरदान"**

**सादरकर्ते : डॉ. सौ. स्नेहल कदम चौधरी,** (क्षितीज फाउंडेशनच्या अध्यक्षा)

दि. १२/१२/१९ गुरवार ला "मासिक पाळी एक वरदान" ह्या विषयावर व्याख्यान आयोजित केले गेले. व्याख्यानं करिता मान. सौ. स्नेहल चौधरी कदम, क्षितीज फाउंडेशन च्या अध्यक्षा तसेच S.D.P.O. city (Sub Divisional Police Officer) च्या धर्मपत्नी, ह्यांनी गावातील शाळेच्या इयत्ता ८ वी, ९ वी. आणि १० वी. च्या ६६ मुली व शिबिरातील ७० मुलींचे मार्गदर्शन केले. त्यांच्या मासिक पाळी बद्दल चे त्रास व भीती जाणून घेतली व ह्या सर्व त्रासा पासून कसे मुक्त व्हावे त्याकरिता उपाय सुचवून त्यांचे मार्गदर्शन केले. गावातील मुलीं सोबत झालेले संवाद अतिशय सुंदर होते. आणि मुलींनी पण न घाबरता आपले प्रोब्लेम्स सौ कदम सोबत मांडले.

**कार्यक्रम : "स्त्री सन्मान व सुरक्षा"**

**सादरकर्ते : मा. गोपाल मुकुंदे** (पो.कां. SWAS, दामिनी पथक, अकोला पोलिस)

दुपारच्या सत्रात विद्यार्थ्यांसाठी "स्त्री सन्मान व सुरक्षा आणि सुरक्षात्मक उपाय योजना" विषयावर मा. श्री.गोपाळ मुकुंदे (पो.का.दामिनी पथक अकोला पोलीस) यांचे मार्गदर्शन केले आणि त्याचप्रमाणे मा. श्री. विशाल मोरे (पो. का. दामिनी पथक अकोला पोलीस) यांनी "स्त्री सन्मान व सुरक्षा" या विषयावर विद्यार्थांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ समाधान मुंडे (रासेयो कार्यक्रम अधिकारी) यांनी करून दिला. संचालन अखीलेश पुराणिक यांनी तर आभार प्रदर्शन गोविंद आंधळे यांनी केले .

**कार्यक्रम : "मोतीबिंदू मुक्त गाव"**

**सादरकर्ते : डॉ. शिरीष थोरात,** (M.B.B.S., D.O.M.S. नेत्राशाल्या चिकित्सक)

गावातील वरिष्ठ नागरिकां करिता **"मोतीबिंदू मुक्त गाव"** हे मोफत डोळे तपासणी शिबीर आयोजित केले गेले. प्रभात फेरी दरम्यान व दवंडी देऊन गावकऱ्यांना ह्या शिबिराबद्दल माहिती देण्यात आली. ४५ वर्षाच्या वर असलेले वरिष्ठ नागरिकांचे नावं नोंदविण्यात आले. ह्या प्रकल्पा अंतर्गत नेत्र रोगतज्ञ डॉ. शिरीष थोरात ह्यांचे सहकारी डॉ. रितेश कोटेचा ह्यांनी ८३ गावकर्यांचे डोळे तपासले. ह्या ८३ लोकांपैकी २७ लोकांना मोतीबिंदू असल्याचे दिसून आले आणि ७ रुग्णांना ऑपरेशन कार्याचे सांगण्यात आले. ह्या ७ गावकऱ्यांना अकोल्यातील थोरात नेत्र रुग्णालयात मोफत तपासणी आणि ओपरेशन करिता बोलाविण्यात आले. डॉ. शिरीष थोरात ह्यांचे सामाजिक सेवेबद्दल मनः पूर्वक आभार.

**शक्रवार**

**दिनांक : १३ /१२/२०१९**

**कार्यक्रम : "रक्तगट तपासणी शिबीर "**

**सादरकर्ते : मा. डॉ. उमेश भालेकर, सूक्ष्म जीवशास्त्र विभाग प्रमुख.** (श्री.रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला)

दि. १३/१२/१९ शुक्रवार रोजी श्री रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र तसेच जीव रसायन शास्त्र विभागाकडून रासेयो च्या विशेष शिबीर ग्राम अपोती येथे **मोफत रक्तगट तपासणी शिबीर** आयोजित करण्यात आले. ह्या शिबिराचे आयोजन मा.डॉ. यु. के. भालेकर,सूक्ष्म जीवशास्त्र विभाग प्रमुख तसेच प्रा. सोनाली गवांदे ह्यांनी केले. ह्या शिबिर करिता कु. प्रिया इंगळे, कु. शीतल घुगे, कु. श्रद्धा महेश्वरी, संदीप तोष्णीवाल ह्या शिक्षकांचा सहभाग होता. गावातील क.बा.आ.वी. महाविद्यालयाचे मुख्याध्यापक श्री सतीश जाधव हे प्रमुख पाहुणे होते . ९ वी आणि १० वी च्या १०० शालेय विद्यार्थ्यांचे रक्तगट तपासून देण्यात आले. हे शिबीर सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख, वरिष्ठ प्राध्यापक, मान. डॉ. यु.के. भालेकर व प्राध्यापिका सोनाली गवांदे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालाच्या मुख्याध्यापकांनी त्या करिता मा.डॉ. भालेकर आणि डॉ. जोशी ह्यांचे आभार मानले.

**कार्यक्रम : "आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा"**

**सादरकर्ते : D.M.C. Club,** श्री.रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला

श्री.रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाद्वारे दत्तक ग्राम आपोती (खु.) येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे आठ दिवसीय शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात श्री.रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे समन्वयक व रासेयोचे क्षेत्रीय समन्वयक डॉ. सुधीर कोहचाळे यांनी आपल्या प्रशिक्षित स्वयंसेवकांसोबत प्रात्यक्षिके दाखवत आपत्तीला न डगमगता कशा प्रकारे सामोरे जाता येऊ शकते याबद्दल मार्गदर्शन केले.

प्रथमतः डॉ.कोहचाळे यांनी आपत्तीची खरी ओळख करून दिली आपत्तीचे प्रकार काय आणि कसे असतात हे स्पष्ट करून त्यावर प्रकाश टाकला. यानंतर प्रशिक्षित स्वयंसेवकांसोबत दोराच्या साह्याने आपण आपत्तीच्या काळात कशा प्रकारे वापर करून विविध गाठांचा उपयोग होतो, त्यावर त्यांनी मार्गदर्शन केले. अपघात झाला असेल तर पीडित व्यक्तीला कशाप्रकारे प्रथमोपचार द्यावा याचे प्रात्यक्षिक दिले. त्यानंतर पुनर्जिवितीकरण कशाप्रकारे करण्यात येते हे प्रात्यक्षिकांच्या स्वरुवात त्यांनी रासेयोच्या शिबिरार्थींना दाखविले. तसेच प्रशिक्षित स्वयंसेवक श्री.अक्षय घोपे यांनी सर्पदंश झाल्यास कशाप्रकारे सामोरे जावे याबाबतीत मार्गदर्शन केले. सर्व आप्पत्या सांगून येत नाहीत आणि आपण जर आपत्यांनाच समजून घेतले आणि त्याची माहिती पूर्ण स्वरूपात ठेवली तर सर्व समाज जीवित आणि वित्तहानी पासून वाचू शकतो.

"Know Disaster No Disaster"

**कार्यक्रम :** **"अवकाश दर्शन -समाजातील गैरसमज"**

**सादरकर्ते :** **प्रा. शैलेश जैस्वाल,** श्री.रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला.

"आपले विश्व" या विषयावर उद्बोधन करण्याकरिता श्री. रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालयाचे प्रा.शैलेश जयस्वाल (भौतिकशास्त्र विभाग) हे आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आपले विश्व, ब्रह्मांड, आकाशगंगा याविषयी माहिती दिली. तसेच ग्रह-तारे व नक्षत्रां विषयी माहितीसुद्धा त्यांनी शिबिरार्थींना दिली. कार्यक्रमाचे संचलन गोविंद आंधळे तर आभार प्रदर्शन कु.यशश्री डाबेराव या विद्यार्थ्यांनी केले

**सांस्कृतिक कार्यक्रम:**

या दिवशी चे शेवटचे सत्र सांस्कृतिक कार्यक्रमांचे होते. या कार्यक्रमात बहुतांशी स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. शिबिरार्थींनी गीत-गायन, नृत्य आणि नाटिका सादर केल्या.एका पेक्षा एक दर्जेदार कार्यक्रमांनी या संध्येला रंगत आली.सांस्कृतिक कार्यक्रमांना गावकऱ्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचलन गोविंद आंधळे या विद्यार्थ्याने केले.

**शनिवार**

**दिनांक : १४ /१२/२०१९**

सातव्या दिवसाच्या सकाळच्या सत्रात प्रार्थना, प्राणायाम , वेगवेगळे योगासने करून दिवसाची सुरवात झाली आणि त्याचबरोबर श्रमदानाकरिता गावातील दोन शोष खड्डे तयार करण्यात आले. हे शोष खड्डे करतांना गावातील सरपंच सौ. लक्ष्मीताई घुसे , उपसरपंच डॉ. उमेश बोपटे ग्रामपंचायत सदस्य, त्याचप्रमाणे गावातील मंडळीचे हि सहकार्य लाभले. ५*५*६ फुटाचे शोष खड्ड्यांचे आर्थिक मुल्यांकन जवळपास ३०,०००/- ते ४०,०००/- काढण्यात आले आहे. या शिबिराचा शोष खड्डे बनविण्याचा मुख्य उद्देश म्हणजे गावात पनिअन्चै टंचाई आहे तसेच हा भाग खार पानपट्टा आहे, गावातील सांडपाणी वाया न घालवता त्या संद्पाण्याला मार्गी लावून जमिनीत मुरविण्याकरिता आणि पाण्याची पातळी वाढविण्याकरिता दोन शोष खड्डे तयार केले गेले. हेच सांडपाणी गावातील रस्ते खराब करीत होते व आजारांना निमंत्रण देत होते. हे खड्डे केल्याने मच्चार कमी होऊन गाव हि स्वच्चा झाले आणि संड पाण्याचे व्यवस्थापनामुळे पाण्याची पातळी वाढविण्यास मदत होत आहे. सर्व गावकर्यांना लाभ ह्याचा होत आहे.

**"उन्नत भारत अभियान – पारिवारिक सर्वेक्षण "**

शिबीरादर्म्यान काही विशेष प्रकल्प राबविण्यात आले. जसे **उन्नत भारत अभियान** दरम्यान दत्तक ग्राम अपोती (खु.) सोबत चार इतर गावांचे परिवार सर्वेक्षण प्रपत्र भरण्यात आले. आपोती (खु.)- १६३, अपोती (बु.)- १४४, आपतापा - २३१, आखतवाडा- १३० आणि सुलतानपूर - ३० अशे मिळून ६९८ परिवारांच्या माहितीचे प्रपत्र रासेयो चमू द्वारे भरण्यात आले.

**शनिवार**

**दिनांक : १४ /१२/२०१९**

**कार्यक्रम :** **"विशेष शिबीर समारोप कार्यक्रम"**

शनिवार दि.१४/१२/२०१९ रोजी शिबिराचे समारोप करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मान. श्री सत्यनारायणजी बाहेती, कार्य. सदस्य, दि बी.जी.ई. सोसायटी,अकोला ह्यांनी भूषविले तसेच मान. श्री शांतारामजी बुटे, संस्थापक, क.शि.प्र.संस्था, आपातापा, हे प्रमुख पाहूणे होते. मान. श्री अनिलजी तापडिया, कार्य. सदस्य, दि बी.जी.ई. सोसायटी, अकोला. महाविद्यालयाचे प्राचार्य मान. डॉ. वी.डी. नानोटी, मान. श्री दामोदार्जी कडू, अध्यक्ष, क.शि.प्र.संस्था, आपातापा, सौ. लक्ष्मीताई घुशे, सरपंच, आपतापा, श्री कैलासरावआपोतीकर, पोलिस पाटील, आपातापा ह्यांची विशेष उपस्थिती होती.

२३ डिसेंबर रोजी दुपारच्या सत्रात रासेयोच्या विशेष शिबिराचा समारोप कार्यक्रम पार पडला.या कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी मा. डॉ. व्ही. डी. नानोटी (प्राचार्य श्री.रा.ल. तो. विज्ञान महाविद्यालय ,अकोला) हे लाभले होते. तसेच मा. श्री. सत्यनारायणजी बाहेती (कार्य. सदस्य दि .बी .जी. इ. सोसायटी, अकोला),मा. डॉ.संजय तिडके (जिल्हा समन्वयक रासेयो अकोला), मा.डॉ सुधीर कोहचाळे (क्षेत्रीय समन्वयक रासेयो, अकोला) मान्यवरांची प्रमुख

उपस्थिती होती. कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. समाधान एल. मुंडे व प्रा.डॉ.रश्मी पी.सावलकर तसेच सह-कार्यक्रम अधिकारी प्रा. शैलेश आर.जयस्वाल व प्रा. सोनाली एन.गवांदे हे देखील उपस्थित होते.

विशेष शिबिर ग्राम आपोती (खु.) या आठ दिवसीय शिबिराचा विस्तृत अहवाल कार्यक्रम अधिकारी डॉ. समाधान मुंडे यांनी प्रस्तुत केला. समारोपीय कार्यक्रम हा विशेषतः विद्यार्थ्यांचे मनोगत आणि सत्काराचा असतो म्हणून या ठिकाणी काही विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.कु. गायत्री आपोतीकर तसेच गटप्रमुख कु.यशश्री एस. डाबेराव व गटप्रमुख श्री.गोविंद बी.आंधळे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले.क्षेत्रीय समन्वयक डॉ.सुधीर कोहचाळे यांनी विद्यार्थ्यांना यशस्वी शिबिरा च्या शुभेच्छा दिल्या.कार्य.सदस्य दि. बी.जी.ई.सोसायटी, अकोला श्री. सत्यनारायणजी बाहेती यांनी जीवन घडविण्यात रासेयोचे विशेष योगदान आहे असे सांगितले.मा.प्राचार्य डॉ. व्ही. डी. नानोटी यांनी विद्यार्थ्यांनी राबवलेल्या श्रमदानाबद्दल त्यांचे कौतुक केले.तसेच आठ दिवसीय शिबिरामुळे विद्यार्थी घडतो, सहजीवन,सहभोजन,लोकसेवेची जाणीव या सर्व गोष्टी शिकतो, असे सांगितले.

गट प्रमुख श्री. अखिलेश पुराणिक व गट प्रमुख कु. हृतुजा गोपनारायण ह्यांचा सत्कार मा.डॉ. व्ही. डी. नानोटी व श्री. सत्यनारायणजी बाहेती यांनी शाल,श्रीफळ व रोपटे देऊन केले, तसेच महेश जंजाळ, नरेंद्र जलमकर, कु.नम्रता गायकवाड,कु. निकिता ठाकरे, कु. प्रियंका इंगोले,कु.वैशाली हातोले यांना रोपटे देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचलन डॉ.रश्मी पी. जोशी यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री.महेश जंजाळ यांनी केले.







**श्री रा.ल.तो. विज्ञान महविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षातील रासेयो विशेष शिबीराच्या उद्घाटन प्रसंगी बी.जी.ई. सोसायटी चे मानद सचिव एड. मोतीसिन्हजी मोहता, प्राचार्य डॉ. नानोटी, उपसरपंच श्री बोपटे**







स्वच्छतेचे महामंत्र गावातील लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम प्रभात फेरी मार्फत करतांना रासेयो चे स्वयंसेवक पोस्टर्स च्या माध्यमातून जनजागृती करतांना.




शिबिराचे तिसरे दिवस, "टीम बिल्डिंग" ह्या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. महेश डाबरे, श्रीमती ल.रा.तो वाणिज्य महाविद्यालय अकोला.




पर्यावरण संवर्धन व व्यसनमुक्ती आंदोलन ह्या विषयावर व्याख्यान देतांना डॉ. अजय उपाध्याय, गायत्रीपरिवार अकोला.

| | |
|---|---|
|  |  |
| विधिज्ञ माननीय नीलिमा मानोरकर ह्यांनी गावातील महिलांना “Legal Awareness about Women” ह्या विषयावर मार्गदर्शन केले. | रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी व डॉ.समाधान मुंडे श्रमदनातून शोष खड्डे करून सांडपाण्याचे व्यवस्थापन करतांना. |
|  |  |
| डॉ. जोशी व प्रा. जैस्वाल ह्यांनी गावकर्याच्या मदतिने शोष खड्डे व श्रमदान करतांना रासेयो ची चमू. | सांडपाण्याचे मार्ग बदलून व्यवस्थापन करतांना स्वयंसेवक. |
|  |  |
| रासेयो चे प्रसंचालक मा. डॉ. राजेशजी बुरंगे, सं.गा.बा.अमरावती विद्यापीठ अमरावती, मा. डॉ. बोरकर, रासेयो सल्लागार समिती सदस्य वीद्यार्थी कल्याण समिती सदस्य, ह्यांनी विषेश भेट दिली व “ग्राम विकास व उन्नत भारत” ह्या विषयावर उपस्थितांचे विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन केले. | कायदे विषयक मार्गदर्शन करतांना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे विविध न्यायाधीश व महाराष्ट्र व गोवा बार असोसिएशनचे सदस्य तसेच दि बेरार एज्युकेशन सोसायटी चे मानद सचिव मा. Adv. श्री. मोतीसिन्हजी मोहता मार्गदर्शन करतांना. |







रासेयो चे सहकार्याक्रम अधिकारी प्रा. शैलेश जैस्वाल, डॉ. रश्मी जोशी व स्वयंसेवक.

शिबीराच्या पाचव्या दिवशी महिला मेळावा आणि सोयाबीन प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित केल्या गेली.







महिलांना घरगुती उद्योग व कुटीर उद्योग सुरु करण्याकरिता दैनिक सकाळच्या तनिष्क समन्वयिका मा. वनिता कदम, गावातील महिलांशी संवाद साधतांना तसेच 'आजी चा बटवा" हि स्पर्धा घेण्यात आली.







क्षितीज फाऊनडेशनच्या अध्यक्षा डॉ. स्नेहल कदम "मासिक पाळी एक वरदान" ह्या विषयावर शाळेतील विद्यार्थिनी व रासेयो च्या स्वयंसेविकांचे मार्गदर्शन करून संवाद साधतांना.






"मोतीबिंदू मुक्त गाव" हे एक शिबीर घेण्यात आले ज्यामध्ये गावातील ८७ वरिष्ठ नागरिक महिला व पुरुष शिबिरार्थी ह्यांचा सहभाग लाभला.







श्री रालतो विज्ञान महाविद्यालयाच्या सूक्ष्म जीवशास्त्र विभागाकडून मा.श्री.डॉ. यु. के. भालेकर ह्यांनी अपोतीकर वियालातील १०० विद्यार्थ्यांचे रक्तगट तपासणी शिबीर घेतले. ह्या कार्यक्रमाला मा. प्रा. वैशाली बडगुजर, वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख, डॉ.कविता हेडा, रसायन शास्त्र विभाग, डॉ. अंजली सांगोले, वनस्पतीशास्त्र विभाग, प्रा. सोनाली गवांदे, रासेयो सहकार्यक्रम अधिकारी, श्रीमती. ज्योती गीते. कार्यक्रमाला क.बा.आ.वी. महाविद्यालयाचे मुख्याध्यापक श्री सतीश जाधवह्यांची विशेष उपस्थिती लाभली.




रासेयोचे क्षेत्रीय समन्वयक डॉ. सुधीर कोह्चाले तसेच D.M.C. चे समन्वयक ह्यांनी कार्यशाळा घेतली.



"उन्नत भारत अभियान" अंतर्गत "परिवारिक सर्वेक्षण" करतांना डॉ. रश्मी जोशी व ग्रामस्थ तसेच स्वयंसेवक.





सहकार्यक्रम अधिकारी प्रा.शैलेश जैस्वाल व रासेयोचे स्वयंसेवक ग्राम अपोती बुद्रूक येथे “पारिवारिक सर्वेक्षण” करतांना.







रासेयो विशेष शिबिराचे शेवटचे दिवस व समारोप कार्यक्रम, कार्यक्रमाचे अध्यक्ष, **बी.जी.ई. सोसायटी चे मानद सचिव एड. मोतीसिन्हजी मोहता, कार्यकारिणी सदस्य मा. श्री पवनजी तापडिया, श्री. सात्यनारायणजी बाहेती, मा.प्राचार्य डॉ. व्ही.डी.नानोटी, अपोती खुर्द च्या सरपंच लक्ष्मिताई घुशे, उपसरपंच श्री बोपटे, पोलिस पाटील, प्रमुख पाहुणे मा.श्री. शांतारामजी बुटे, संस्थापक, क.शि.प्र.संस्था, आपातापा, तसेच हयाच संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.दामोदर जी कडू हयांच्या उपस्थितीत समारोप झाला.**




विशेष शिबिराच्या समारोप समारंभात अहवाल वाचन करतांना कार्यक्रम अधिकारी डॉ. रश्मी जोशी व मंचावर उपस्थित सर्व मान्यवर.